**ग्रामीण कृषि मौसम सेवा**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभा**

ईमेल – gkmsakola@yahoo.com

**वाशीम जिल्हा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - २५ / २०१९-२०** **मंगळवार, दिनांक - १७.०९.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १८ सप्टेंबर २०१९ ते २२ सप्टेंबर २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १८/०९ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२/०९ |
| पाऊस (मिमी) | २ | ३ | ३ | ४ | ३ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३० | ३० | ३१ | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| स./ दु ढग स्थिती (आकाश) | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतःढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८९ | ८८ | ९४ | ८९ | ८८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७८ | ७३ | ७० | ७० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| स./ दु वा-याची दिशा | २८९ | २६० | १०५ | ९५ | २५० |

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामानाचा इशारा | | सध्यस्थितीत जिल्यात १७ - २० सप्टेंबर रोजी बऱ्याच ठिकाणी हलका ते मध्यम, तर २१ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलका स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सर्व पिक | वाढ | फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| सर्व पिकावर कीटकनाशके वापर करताना सर्वसाधारणपणे घ्यावयाची काळजी | | पिकावर किडींचा प्रादुर्भाव पाहून त्याच्या नियंत्रणासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी तसेच फवारणी करतांना खबरदारी म्हणून दिलेल्या सुचनाचे पालन करावे, किटकनाशाके हि विषारी असल्याने त्यांची हाताळणी करतानां सदैव जागरूक राहावे. गळके फवारणी यंत्र न वापरता ते दुरुस्त करून वापरावे. फवारणी करताना संरक्षक कपडे उदा. गॉगल, मोजे, तोंडाला मास्क, डोक्यावर, गमबूट, इत्यादी. वापरावे. किटकनाशक पोटात जाण्याची शक्यता असल्याने फवारणीचे मिश्रण करताना अथवा फवारणीच्या वेळी तंबाखू खाणे अथवा धुमपान करणे टाळावे. फवारणीचे काम पूर्ण झाल्यावर हात साबणाने स्वच्छ धुउनच खाणे पिणे करावे. तसेच उपाशीपोटी फवारणी न करता फवारणी पूर्वी न्याहारी करावी. किटकनाशाके अंगावर पडू नये म्हणून वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. तसेच उंच झाडावर फवारणी करताना औषध अंगावर पडणार नाही याची काळजी घ्यावी. या वेतिरिक्त विषबाधेची शंका असल्यास फवारणी करणाऱ्या वेक्तीची सरकारी दवाखान्यांत तपासणी करावी. |
| कपाशी | फुल / पात्या | कपाशीवर गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाचे निदान करण्यासाठी पात्या व फुले लागण्याच्या अवस्थेत वेळोवेळी निरक्षण करावे. बोंडे लागण्याच्या अवस्थेत एक एकर क्षेत्रातून वेगवेगळ्या झाडांची २० बोंडे तोडून ती फोडून पहावीत. खाली गळून पडलेली प्रादुर्भावग्रस्त पात्या, फुले व बोंडे गोळा करून त्वरित नष्ट करावीत व आर्थिक नुकसानाची संकेत पातळी गाठताच पिकावर ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी. किंवा बीटी कपाशीमध्ये रेफुजी झाडावर ५ टक्के प्रमाणावर गुलाबी बोंड अळी दिसून येताच व फुलामध्ये प्रादुर्भाव ५ टक्के पर्यंत आढळून आल्यास प्रोफेनाफॉस ५० टक्के प्रवाही २० मि.लि किंवा क्वीनॉलफॉस २५ टक्के ए एफ २५ मि.लि क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही २५ मि.लि प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. प्रादुर्भाव ५ ते १० टक्के पर्यंत आढळून आल्यास थायोडिकार्ब ७५ टक्के भुकटी २० ग्रॅम किंवा इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के १० मि.लि प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.फवारणी अगोदर आपले स्तनिक वातावरण व पाऊसाचा अंदाज घेऊन काम करावे. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| सोयबीन | फुल / शेंग धारणा | सोयाबीन पिकात शेंगा पोखरणारी अळी आढळून येताच, बॅसीलस थूरीन जी अंसीस कूरसा टाकी म्हणजे बी टी ( सी रो टाईप एच-३९, ३ बी स्टेन झेड -५२) या जैवीक किटकनाशकांची १५ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा नियंत्रणाकरीता करीता इंडाक्झीकार्ब १५.८ टक्के इसी ६ ते ७ मी.ली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी अगोदर आपले स्तनिक वातावरण व पाऊसाचा अंदाज घेऊन काम करावे. सोयाबीन मध्ये पाने खाणा-या |

| | | |
|---|---|---|
| | | अळ्यांचा नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्कांची फवारणी करावी व सोबतच शेतात कामगंध सापळे लावावे, त्याअगोदर आपले स्तानिक वातावरण व पाऊसाचा अंदाज घेऊन काम करावे. सोयाबीनवर चक्रभुंगा असेल तर नियंत्रणासाठी ट्रायझोफॉस ४० टक्के प्रती १२.५ मी.ली किंवा क्लोरट्रनिप्रोल १८.५ टक्के ३.० मी.ली किंवा इथियान ५० टक्के ३० मी.ली प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| तूर | वाढ | तूर पिकात केसाळ आळीचा प्रादुर्भाव आढळल्यास व्यवस्थापनाकरीता क्वीनालफोस २५ टक्के इसी २० मिली व ५ टक्के निंबोळी अर्क प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. पिकावरील पाने खाणा-या अळ्यांचा नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्कांची फवारणी करावी व सोबतच शेतात कामगंध सापळे लावावे, त्याअगोदर आपले स्तनिक वातावरण व पाऊसाचा अंदाज घेऊन काम करावे. |
| मका | दाणे भरणे | लष्करी अळीचा वेळोवेळी निरक्षण करावे व प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणासाठी या अवस्थेत पिकावर फवारणी शक्य नसल्याने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून मजुराच्या सहायाने अळ्या वेचून नष्ट कराव्या सोबतच शेतात कामगंध सापळे लावावे. |
| मुग / उडीद | शेंग परिपक्वता | वेळेवर पेरणी केलेल्या मुगाच्या शेंगा परीपक्व झाल्या असल्यास, शेंगा तोडून वाळत घालाव्या व लगेच त्याची मळनि करून व तयार झालेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |
| हळद | वाढ | हळद पिकामधील पावसाचे अतिरिक्त पाणी सऱ्यामधून बाहेर काढून द्यावे. |
| उस | वाढ अवस्था | उस पिकामध्ये खोड किड्याच्या व्यवस्थापनाकरीता क्वीनालफोस २५ टक्के इ सी प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी स्वच्छ वातावरण व हवा कमी असलेल्या वेळेत करावी. |
| फळझाडे | वाढ | आंबिया बहाराच्या झाडावर या वेळी ढगाळ वातावरणामुळे आणि नवीन पालवी येण्याच्या वेळी सिट्रस साय्लाब किडीची पिल्ले पानांतून रस शोषण करतात. या मुळे फलधारणेवर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते या किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १.५ ते २.० मि.लि किंवा थायोमेथोक्झाम २५ टक्के भुकटी १ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. मृग बहराच्या संत्र्यावर कोळी नियंत्रणासाठी डायकोफॉल २० मि.लि प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व संत्रा होण्याकरिता पोटेशियम नायट्रेट १५ किलो प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजी पाला | लागवड | सद्यस्थितीत लागवड केलेली वांगी व मिरची भाजीपाला पिके तणमुक्त ठेवावीत. भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी व्हर्टीसिलियम लेकॅमी या जैविक किटकनाशाची १ किलो प्रति २०० लिटर पाण्यातुन फवारणी करावी किंवा इमिडाक्लोप्रिड ४ मिली प्रति १० लिटर पाण्यातुन फवारणी करावी. निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी. |
| पशु व पक्षी | | जनावरांचे बाह्य परजीवी पासून रक्षण करण्यासाठी जनावरांना खरारा करावा, यामुळे शरीरावरील बाह्य परजीवी गळून पडतात त्वचा चमकदार दिसते. गोठ्याच्या फटीत हे बाह्य परजीवी लपून बसतात त्यामुळे गोठ्याच्या काण्याकोपऱ्यात शिफारशीत गोचीड नाशकाची फवारणी करावी आणी फवारणी करताना गोठ्यात जनावरे नसावीत. |
| पशु व पक्षी | | जनावरांचे बाह्य परजीवी पासून रक्षण करण्यासाठी जनावरांना खरारा करावा, यामुळे शरीरावरील बाह्य परजीवी गळून पडतात त्वचा चमकदार दिसते. गोठ्याच्या फटीत हे बाह्य परजीवी लपून बसतात त्यामुळे गोठ्याच्या काण्याकोपऱ्यात शिफारशीत गोचीड नाशकाची फवारणी करावी आणी फवारणी करताना गोठ्यात जनावरे नसावीत. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.


नोडल अधिकारी
ग्रामीण कृषि मौसम सेवा, अकोला
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

संशोधन सहयोगी
ग्रामीण कृषि मौसम सेवा,
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला